C/603

सिडको/भूमी/साटयो/ठाणे/२०१९/ 12511 दि. ०८.११.२०१९

**विषय :- ठाणे तालुक्यातील भूखंड वाटपासाठी प्रलंबित असलेल्या गावनिहाय संचिकांची यादी व वाटप करावयाच्या मोकळया भुखंडाची यादी जाहीर सूचनेद्वारे सिडकोच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

ठाणे तालुकयातील नवी मुंबई प्रकल्पगस्तांना १२.५टक्के योजने अंतर्गत भुखंडाचे वाटप सोडतीद्वारे करण्यासाठी भूखंड वाटपासाठी प्रलंबित असलेल्या गावनिहाय संचिकांची यादी व वाटप करावयाच्या मोकळया भुखंडाची यादी "जाहीर सूचनेद्वारे" सिडकोच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्यता प्रदान केलेली असुन सदर भूखंड वाटपासाठी प्रलंबित असलेल्या गावनिहाय संचिकांची यादी व मोकळया भुखंडाची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे.

तरी व्यवस्थापक(प्रणाली) यांना विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या भूखंड वाटपासाठी प्रलंबित असलेल्या गावनिहाय संचिकांची यादी , वाटप करावयाच्या मोकळया भुखंडाची यादी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सिडकोच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात यावी ही विनंती.

क्षेत्राधिकारी
08/11/2019.

सहा. विकास अधिकारी (ठाणे) 8/11

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (ठाणे)

8/11/2019

मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (ठाणे)

व्यवस्थापक(प्रणाली)

SYSTEM DEPARTMENT
CIDCO/SD/SM
RECEIVED
SIGN ........
Date... 08/11/2019
Time - 5.35.pm.

C/605

सिडको/भूमी/साटयो/ठाणे/२०१९ दि. ०८.११.२०१९

## प्रसिद्धीपत्रक

सिडको महामंडळ संचालक मंडळ ठराव क्र. ११९०८ मधील बाब क्र. ७ अन्वये ठाणे तालुक्यातील लिंकेज सेक्टर एक करून नवी मुंबई प्रकल्पग्रस्त भूधारकांना १२.५% योजने अंतर्गत भूखंडाचे वाटप करण्याची प्रक्रिया अटी व शर्तीस अधिन राहून बंद करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच या ठरावास शासनाची मान्यता घेण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालकांना देण्यात आले होते. त्यानुसार सिडको महामंडळाने उक्त ठरावाच्या मंजूरीचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला होता.

सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. सिआडी-३३१८/८२४/प्र.क्र.१६४/नवि-१०, दि.०७, फेब्रुवारी, २०१९ रोजी खालील बाबींचा विचार करुन आपले स्तरावर निर्णय घेण्यात यावा असे कळविले आहे.

i) सिडकोने सर्व ठाणे जिल्ह्यासाठी एक नोड हे धोरण लागू करण्यापूर्वी १२.५% योजनेंतर्गत भूखंड वाटपासाठी उपलब्ध असलेल्या भूखंडाची व पात्रता धारकांची यादी भूखंडांच्या क्षेत्रफळासह सिडकोच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

ii) सर्व ठाणे जिल्ह्यासाठी एक नोड निश्चित केल्यानंतर भूखंडाचे वाटप केवळ लॉटरीद्वारेच करण्यात यावे.

शासनाच्या उपरोक्त निर्देशानूसार ठाणे तालुक्यातील प्रलंबित संचिकांची यादी भाग "अ" व भाग "ब" नुसार केलेली आहे. भाग "अ" मध्ये पात्रता मंजूर असलेल्या व भाग "ब" मध्ये पात्रता पडताळणीवर प्रलंबित असलेल्या संचिकांचा समावेश केलेला आहे. भाग "अ" मधील पात्रता मंजूर संचिकांच्या बाबतीत ज्या भूधारकांचे अनधिकृत बांधकाम अहवाल प्राप्त झालेले आहेत त्या संचिकांचा संभाव्य सोडतीत समाविष्ट करण्यात आलेला आहे. व ज्या भूधारकांचे अनधिकृत बाधकाम मंजूर पात्रतेपेक्षा जास्त आहेत त्या संचिकांच्या समोर पात्रता शिल्लक नसलेबाबतची नोंद घेण्यात आलेली आहे. उर्वरित संचिकांबाबत अनधिकृत बांधकाम अहवाल प्राप्त झाल्यानंतर संचिकांचा पुढील संभाव्य सोडतीमध्ये समावेश करण्यात येईल.

भाग "ब" मधील संचिकांच्या बाबतीत भूधारकांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांच्या पात्रता पडताळणीबाबत निश्चिती करून पुढील संभाव्य सोडतीमध्ये समावेश करण्यात येईल.

तसेच या सोबत वाटपासाठी उपलब्ध असलेल्या मोकळया भूखंडाची यादी प्रसिद्ध करीत आहोत.

8/11/2019

मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (ठाणे)